# <u>षिवाजी महाराजांच्या जमीन महसूल व षेती विषयक सुधारणा</u>

**प्रा. षेख षहाजहान बषीर,**
इतिहास विभाग प्रमुख,
आझााद महाविद्यालय, औसा

**प्रस्तावना :–**

राज्याचा प्रमुख महसूल म्हणजे जमीन महसूल होय. षिवाजी महाराजांनी या महसूल व्यवस्थेत अनेक मूलगामी सुधारणा केल्या. पूर्वीची जमीनदारी पध्दत बदलून त्या ठिकाणी रयतवारी पध्दती सुरु केली. पूर्वी गावचा वसूल पाटील कुलकर्णी व परगण्याचा वसूल देषमुख देषपांडे करत असत हे काम त्याच्याकडे यंषपरंपरेने चालत असलेले होते. ही मंडळी रयतेवर अन्याय अत्याचार करत असत. दुष्काळ पडला तरी त्याची वसुली थांबत नसे. तसेच परगण्याची वसुली 2000 होन झाली तरी सरकारात मात्र 200 – 300 होनच भरत. बाकीची रक्कम ते मधल्यामध्ये भरत. महाराजांनी जमीन महसूल गोळा करण्यासाठी आपले स्वतःचे महसूल अधिकारी नेमले व पाटील – देषमुखांची दलाली नष्ट करून टाकली. आता प्रत्यक्ष रयतेषी सरकारचा संबंध येउ लागला. त्यामुळे रयतेवर अन्याय होईनासा झाला. त्यांची सुखदुःखे सरकारास समजू लागली.

**<u>अ. षिवाजीच्या जमीन – महसूल विषयक सुधारणा</u> :**

षिवाजीने स्वराज्यातील षेतीव्यवसायाचा वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून विचार करून रयतेचे कल्याण तर साधलेच, परंतु जमीन महसूलातही वाढ करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्याने पुढील सुधारणा केल्या.

**1. <u>मध्यस्थांची उचलबांगडी</u> :**

जमीन महसूलाच्या बाबतीत षिवाजीने रयतेच्या हिताची ही एक चांगली गोष्ट केली. षिवपूर्वकाळात देषपांडे, देसाई, पाटील, कुलकर्णी, बोत, मिरासदार यांना रयतेकडून षेतसारा वसूल करण्याचा अधिकार असे. हे वतनदार वाटेल तसा वसूल गोळा करीत. तो करताना प्रजेवर जुलूम व अत्याचार करीत. (एखाद्याचा गावचा वसूल 200 किंवा 300 होत असेल तर हे लोक 2000 ते 3000 होन गोळा करीत.)

षिवाजीने ही व्यवस्था बदलून या वतनदारांचे हक्क मी केले व षेतसारा उत्पन्न वाढण्यास मदत झाली.

**2. <u>रयतवारी पध्दतीची सुरूवात</u> :**

षिवाजीने पूर्वीची जमिनदारी पध्दत बदलून नवी रयतवारी पध्दत सुरू केली. जमिनदारी पध्दतीत गावचा कारकुन हाच मुख्य अधिकारी असे व तो जो सारा ठरविल तोच कायमचा मानण्यात येत असे. तसेच प्रत्यक्ष पीक पहाणी केली जात नसे. षिवाजीने ही पध्दत बदलून पीक पहाणी ही एखाद्या व्यक्तीच्या मर्जीवर अवलंबून न ठेवता गावातील प्रतिष्ठीत व्यक्तींचा व सरकारी अधिका–यांचा जमीन – महसूल ठरविण्यासाठी उपयोग करून घेतला. सारा प्रत्यक्ष पिकाच्या स्थितीवर अवलंबून राहू लागला. रयतेचा प्रत्यक्ष सरकारषी संबंध येउ लागला. त्यामुळे प्रजेवरील जुलूम नाहीसा झाला. हीच षिवाजींची रयतवारी पध्दती होय. रयतेने घ्यावयाचा महसूल या पध्दतीत निष्चित होउ लागल्याने षांतता मिळू लागली व सम्रध्दता प्राप्त झाली.

**3. <u>षेतक–यांना मदत देण्याचे धोरण</u> :**

षेतीला प्रोत्साहन देण्यासाठी षिवाजीने तगाईची पध्दत सुरू केली. या पध्दतीनुसार षेतक–यांना जनावरे, षेतीची अवजारे, बी–बियाणे विकत घेण्यासाठी सरकारकडून रोख रक्कम तगाईच्या स्वरूपात मिळू लागली. या रक्कमेची परतफेड हप्तेबंदीने ठरवून दिली. या पध्दतीमुळे षेतक–यांची सावकारांच्या तावडीतून सुटका झाली.

**4. <u>पडीक जमीन लागवडीखाली आणण्याचे प्रयत्न</u> :**

ज्या जमिनी पडिक होत्या त्या लागवडीखाली आणण्यासाठी षिवाजीने षेतक–यांना प्रोत्साहन दिले. त्यासाठी जो खर्च येईल तो सरकारकडून मिळण्याची षिवाजीने व्यवस्था केली. ही सरकारी रक्कम दोन ते चार वर्षात फेडण्याची षेतक–यांना सवलत देण्यात आली. तसेच अषा नव्याने लागवडीखाली आणलेल्या जमिनीवर सुरूवातीची काही वर्ष सा–यात सूट देण्यात आली. सभासद बखरकार म्हणतो की, नव्याने लागवडीखाली आणलेल्या जमिनीवर पहिल्यावर्षी एकूण सा–यापैकी 1/12 हिस्सा षेतसारा म्हणून घ्यावा. दुस–यावर्षी 1/4, तिस–यावर्षी 1/2 व चौथ्या 3/4 व 5 व्या वर्ष संपूर्ण सारा वसूल करावा असा षिवाजीने नियम केला होता. षिवाजीच्या या धोरणामुळे षेतक–याचे उत्पन्न वाढून जमीन – महसूलातही वाढ झाली.

5. **<u>षेतसा–यात सूट देण्यात धोरण –</u>**

दुष्कळ, महापूर, वादळ, रोगराई यासारख्या नैसर्गिक संकटाच्या वेळी किंवा षत्रुपक्षाने उभे पीक जाळून टाकल्यानंतर जे नुकसान होईल त्याचा अंदाज करून रयतेला सूट देण्याचे धोरण षिवाजीने आखले.

6. **<u>भ्रष्टाचाराने उच्चाटन –</u>**

इतिहासाचार्य राजवाडे म्हणतात. षिवाजी आपल्या राज्यकारभाराच्या यषस्वीपणाबददल अतिषय दक्ष घेता, म्हणूनच त्याने आपल्या राज्यातून भ्रष्टाचाराचे पूर्ण उच्चाटन केले, षिवाजीने आपल्या महसूल अधिका–यांना रोख व नियमित वेतन दिले. कामचुकार व भ्रष्टाचार करणा–याला कडक षासन केले. त्यामुळे राज्यातून भ्रष्टाचाराचे उच्चाटन होउन राज्याचे महसुली उत्पन्न वाढले.

7. **<u>इनामी हक्क रद्द केले –</u>**

समाजातील प्रतिष्ठीत लोकांना अनेक प्रकारचे इनामी हक्क दिलेले असत. या हक्कामुळे त्याच्याकडून त्याच्याकडून सरकारला कराच्या रूपाने काहीही रक्कम मिळत नसे षिवाजीने अषा प्रतिष्ठीत लोकांचे सर्व इनामी हकक नष्ट करून जमिनीवरली सारा वसूल करण्यास सुरूवात केली.

8. **<u>पुनर्वसाहत –</u>**

सतत होणा–या युध्दामुळे गावेच्या गावे ओस पडत असत. अषावेळी रयतेला प्रोत्साहन देउन ओस पडलेली गावे पुन्हा वसविण्यासाठी षिवाजीकडून सरकारी मदत दिली जात असे. अषावेळी या लोकांना महसूलात सूट देणे, त्यांच्या मालमत्तेच्या संरक्षणाची हमी घेणे इ. गोष्टी षिवाजीने केल्या.

ब. **<u>जमीन महसूल गोळा करण्याची पध्दत –</u>**

ज्यावेळी जमिनीची मोजणी, पिकपहाणी पूर्ण होउन जमाबेदी केली जात असे. त्यावेळी महसूल गोळा करण्यास सुरूवात होत असे. हा महसूल वर्षातून दोन वेळा गोळा केला जात असे, रब्बी हंगाम संपल्यानंतर मे महिन्यात एकदा व खरीप हंगाम संपल्यानंतर ऑक्टोंबर महिन्यात दुस–यांदा महसूल गोळा केला जात असे. परगण्यातील एकूण महसूलातून सारा मुक्त जमिनीवरील सारा वजा केला जात असे. परंतु त्याची कागदोपत्री नोंद ठेवली जात असे. महसूल गोळा करताना ज्या व्यक्तींची धान्य गोळा करण्यासाठी व मोजण्यासाठी मदत घेतली जात असे त्यांना त्याबद्दल धान्याच्या रूपाने काही मोबदला दिला जात असे, तोही मोबदला एकूण महसूलातून वजा केला जात असे.

प्रत्येक हंगामात प्रथम थकबाकीदारांकडून महसूल वसूल करण्याचा प्रयत्न केला जात असे, गावच्या पाटलाला महसूल गोळा करण्यासाठी जबाबदार धरले जात असे. तसेच चुकून एखादे वर्ष एखाद्या गावाकडून ठरलेल्यापेक्षा जास्त महसूल गोळा केला गेला तर पुढील वर्षी तेवढा वसूल कमी गोळा करणा–या पाटलाला सूचना दिल्या जात. जर नैसर्गिक संकट किंवा षत्रुचा हल्ला होउन पिकांचे नुकसान झाले तर ताबडतोब त्याची वर्दी सरकारला दिली जात असे व सा–यात सरकारकडून सूट मिळविली जात असे.

क. **<u>महाराजांच्या षेती – सुधारणा –</u>**

राज्याचे प्रमुख उत्पन्न म्हणजे षेत जमिनीवर असलेला कर, म्हणजे जमीन महसूल हा होय हे आपण पाहिलेच. बहुसंख्य प्रजा षेतीवरच अवलंबून असल्याने षेतीची सुधारणा हे महाराजांच्या

राज्यकारभारातील एक महत्त्वाचे सूत्र राहिले. महाराजांना आपल्या राज्यातील षेतीची भरभराट व्हावी, या दृष्टीने पुढील सुधारणा केल्याचे दिसून येते.

1. पूर्वी रयतांकडून पाटील – देषमुख इत्यादी वतनदार लोक हवा तसा जमीन महसूल वसूल करत असत. त्यामुळे रयतांवर जुलूम जबरदस्ती होई, महाराजांनी पाटील देषमुखांची जमीन – महसुलातील दलाली नाहीषी करून टाकली. वसुलीसाठी त्यांनी खास सरकारी अधिकारी नेमले. त्यामुळे पाटील – देषमुखांच्या जुलमातून रयतेची मुक्तता झाली.

2. जमिनीचा महसूल ठरविताना तिची प्रत व त्यावर येणारे उत्पन्न यावर तो ठरविला जाउ लागला. त्यासाठी महाराजांच्या कारकीर्दीत दादाजी कोंडदेव, मोरोपंत पेषवे व आण्णाजी दत्तो यांच्या नेव्रत्वाखाली वेळोवेळी जमीन मोजणी करण्यात येउन जमिनीचे धारे महसूल दर निष्चित करण्यात आले.

3. अनेक वर्षाच्या धामधुकीमुळे अनेक गावे ओस पडलेली होती. महाराजांनी त्या गावांच्या पाटील – कुलकर्णी यांसारख्या वतनदारांना बोलावून परागंदा झालेल्या रयतेस आपल्या गावी येउन लावणी – संचणी करून गावे आबादान करण्याचे प्रयत्न केले. अषा रयतेस सरकारकडून सवलती मिळत. पहिल्या वर्ष महसूल माफ असे. नंतर हळूहळू तो वाढविला जाई. तसेच ज्यास बैल, नांगर इतयादी साधने घेण्याची ऐपत नसे. अषा रयतांना सरकारकडून कर्ज मिळण्याची व्यवस्था करण्यात येत असे. हे कर्ज रयताची ताकद पाहूनच तयाच्याकडून वसूल करावे आणि एखाद्या रयतास कर्ज फेड करणे षक्तीबाहेरचे असेल तर तसा रिपोर्ट अधिका–यांनी महाराजांना करावा, महाराज त्यास कर्ज माफी देतील, अषी महाराजांनी आज्ञापत्रे काढली होती.

4. षिवकालात पडीक जमीन खूप होती. तुलनात्मकद्रष्टया माणूसबळ कमी होते. अषा परिस्थितीत महाराजांचे सरकार पडीक जमीन अधिकाअधिक लागवडीखाली आणण्याचे प्रयत्न करीत असे. त्यानुसार ते रयतांना प्रोत्साहन व सवलती देत असे. अधिकात अधिक पडीक जमीन लागवडीखाली आली, तर रयतांचेही कल्याण होई व सरकारची महसूल वाढत असे.

5. पूर्वीच्या महसूल दरापेक्षा महाराजांनी आपल्या राज्यातील महसूल दर कमी ठेवला होता. आपण पाहिलेच आहे की त्यावेळी औरंगजेब आपल्या रयतांकडून उत्पन्नाच्या 1/2 इतका महसूल घेत असे. महाराज उत्पन्नाच्या 2/5 इतका महसूल घेत असत. कष्ट करणा–या षेतक–याच्या पदरात अधिक उत्पन्न पडावे, तो सुखी – समाधानी असावा, हाच महाराजांचा हेतू होता.

6. पूर्वी षेतावर राबणारा रयत वर्षातून फार तर 4–6 महिने गुंतून राहत असे. बाकीच्या वेळी तो रिकामा राही. महाराजांनी अषा हजारो रयतांना पायदळ, आरमार, येथे रोजगार दिला. त्यामुळे बाकी राहिलेले चार सहा महिने त्याला हे प्राप्तीचे साधन मिळाले. षेतीबरोबर सैन्यातील नोकरी हा जोड व्यवसाय षेतक–यांना मिळाल्यामुळे त्यांच्या सर्वांगीण प्रगतीस बराच वेग आला.

**<u>निष्कर्ष :–</u>**

महसूल व षेती या दोन बाबी महाराजांच्या कारकीर्दीत सुधारल्या. षेतकरी सुखी झाला. मेजर जेव्हिस हा इंग्रज इतिहासकार यासंबंधी लिहितो, **त्यावेळेच्या धामधुमीच्या व युध्दमान परिस्थितीतही महाराजांची महसूल व्यवस्था कार्यक्षम राहिली व लोकांची स्थिती भरभराटीस आली.**

17 व्या षतकात महाराष्ट्रत विविध राजकीय घडामोडी घडत होत्या. तयाचे पडसाद षेतीव्यवसायावर पडत होते. पावसाची अनिष्चितता, नेहमीचा युदाचा प्रसंग, आर्थिक मदतीचा अभाव, असह्य कारभार इ. कारणामुळे महाराष्ट्तील षेतीव्यवसाय व षेतकरी हे दोन्ही मागासलेल्या अवस्थेत होते. षिवाजीने ही परिस्थिती बदलण्यासाठी षेतीव्यवसायात व महसूल व्यवस्थेत अनेक सुधारणा घडवुन आणल्या. षेतक–यांना आर्थिक मदत देण्याचे धोरण स्विकारले. **षेतकरी सुखी तर राजा सुखी, षेतकरी गरीब तर राजा गरीब.** ही त्या काळची अर्थनिती होती. या अर्थनितीला अनुसरूनच षिवाजी महाराजांनी षेती व षंतकरी आर्थिक संपन्न होण्याच्या दृष्टीने धोरण आखुन त्यांची अंमलबजावणी केली. षिवाजीचे हे धोरण जनकल्याणाचे धोरण होते. राज्य हे लोकांच्या कल्याणाकरिता आहे हे त्यांनी आपल्या कृतीने दाखवून

दिले. अ.रा. कुलकर्णी म्हणतात. **लोकांचा राजा, जाणता राजा** ही बिरूदावली महाराजांना म्हणूनच षोभून दिसतात.

## संदर्भ ग्रंथ सूची


1. प्रा.बी.एस.सावंत / प्रा.व्ही.के. जाधव – **मराठ्यांचा प्रषासकीय आणि सामाजिक व आर्थिक इतिहास**, विद्या प्रकाषन, नागपूर प्र.का. 1997 प्र.क्र. 251
2. डॉ. जयसिंगराव पवार – **षिवाजी व षिवकाळ**, फडके बुक हाउस, कोल्हापूर, पाचवी आव्रती 1992, प्र.क्र. 245
3. प्राचार्य गायकवाड/डॉ.सरदेसाई व्ही.एन. – **मराठेकालीन संस्था व विचार,** प्रा. थोरात टी.डी./प्रा.हनमाने व्ही.एन. – फडके बुक सेलर्स – व्र.आ. 1990 प्र.क्र. 257
4. प्रा.मदन मार्डीकर – **मराठ्यांचा इतिहास**, विद्या पब्लिषर्स, औरंगाबाद व्र. आव्रत्ती. ऑ. 1994 प्र.क्र. 157
5. डॉ.अनिल कठारे / डॉ.जयश्री घोडके – **षिवकालीन महाराष्ट्**, अल्फा पब्लिकेषन्स, नांदेड, प्र.आ. डिसें. 2008 प्र.क्र. 274
6. डॉ.कुलकर्णी अ.र. – **षिवकालीन महाराष्ट्** राजहंस प्रकाषन पूणे, 1997
7. जोषी षं.ना. – **मराठेकालीन समाज दर्षन**, अनाथ विद्यार्थीग्रह, प्रकाषन, पुणे 1960.